## *राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक - ३२००/२०२१/नाशिक**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. खंडु निवृत्ती बेंडकोळी,<br>मु. पो. धोंडेगांव,<br>ता. जि. नाशिक. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत कार्यालय, धोंडेगांव,<br>ता. जि. नाशिक. | : | प्रतिवादी |
| २ | प्रथम अपिलीय अधिकारी तथा,<br>विस्तार अधिकारी (ग्रा.पं.),<br>पंचायत समिती कार्यालय, नाशिक,<br>ता. जि. नाशिक. | : | प्रतिवादी |

**सुनावणी दिनांक - ०२/०८/२०२२**

अपिलार्थी यांनी दिनांक २७/१०/२०२१ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल केले असून त्यामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी चुकीची, अपुर्ण व दिशाभुल करणारी माहिती पुरविली नाही, असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी दिनांक ०२/०८/२०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती.

**सुनावणीसाठी उपस्थित - सर्व पक्षकार उपस्थित होते.**

अपिलार्थी यांनी दिनांक ०३/०७/२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये सन २०२० ते सन २०२१ या कालावधीतील प्रोसिडींग ठराव निरीक्षणाबाबत १) दलित वस्ती सुधारणा ठराव प्रती, २) रस्ते, गटारी, पाणी योजना या कामांच्या ठराव प्रती, ३) केंद्र सरकार, महाराष्ट्र सरकार, जिल्हा परिषद, पंचायत समिती, यांच्याकडुन आलेला निधी, वापरलेला निधी, उर्वरित निधी यांची माहिती, ४) डेडस्टॉक रजिस्टर प्रती, ५) ऑडिट रिपोर्ट प्रती, ६) कामांच्या व्यवहार नोंदी प्रती तसेच झालेली कामे इस्टिमेट ऑल ऑर्डर ठराव प्रती, ७) ग्रामपंचायत कर्मचारी संख्या व त्यांचे वेतन श्रेणी किंती (मासिक व पदनाम यांच्याविषयी माहिती, ८) १४ व्या व १५ व्या वित्त आयोगांतर्गत प्राप्त निधी, खर्च, शिल्लक निधी प्रती, ९) ग्रामनिधी जमा खर्च, शिल्लक निधी प्रती, १०) दलित वस्ती करीता प्राप्त निधी, खर्च, शिल्ल्क निधी प्रती तसेच १०) पेसा आयोगांतर्गत प्राप्त निधी, खर्च, शिल्लक निधी प्रत देण्याबाबत माहिती मागितली होती. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना दिनांक २३/०७/२०२१ रोजीच्या पत्रान्वये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये मागणी केलेल्या अर्जातील प्रथम विषयाची माहिती देणे

आवश्यक असल्याने प्रथम विषयाची माहिती एकुण ०२ प्रती असुन टपाल खर्चासहित एकुण रुपये २९/- माहिती शुल्क जमा करुन कार्यालयीन वेळेत घेउुन जावी, असे कळविले आहे. त्यानुसार अपिलार्थी यांनी दिनांक १७/०८/२०२१ रोजी माहिती शुल्क भरल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २०/०८/२०२१ रोजीच्या पत्रान्वये मागणी केलेली माहिती ग्रामपंचयतीचने तयार केलेली असुन आपण अनेक विषयांची माहिती मागितली असल्याने प्रथम विषयाची माहिती सोबत सादर करण्यात येत असुन इतर विषयासाठी महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. केंमाअ-२००९/प्र.क्र.३९८/०९/सहा, मंत्रालय, मुंबई-४०००३२ दिनांक ३१/०५/२०१२ नुसार स्वतंत्र अर्ज करावा, ही नम्र विनंती.

तद्नंतर अपिलार्थी यांनी दिनांक १५/०९/२०२१ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपिल दाखल केले. सदर प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी दिनांक १४/१०/२०२१ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना मुद्दा क्र. १ ची माहिती उपलब्ध असुन त्याची माहिती देण्यात आली व शासन परिपत्रक क्र.केमाअ-२००९/प्र.क्र.३९८/०९/सहा, दिनांक ३१/०५/२०१२ राज्य शासन राजपत्र दिनांक १६ जानेवारी, २०१२ नुसार ३(क) अधिनियमाच्या कलम ६ अन्वये माहिती मिळण्यासाठीचा लेखी विनंती अर्ज एकाच विषयाशी संबंधित असावा, या बाबत स्वतंत्र अर्ज करण्याबाबत कळविण्यात आलेले असल्याने अपिलार्थी यांनी स्वतंत्र अर्ज करावा, असे नमुद करुन प्रथम अपील निकाली काढले.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक ०३/०७/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस विहित मुदतीत उपलब्ध माहितीचे माहिती शुल्क भरण्याबाबत कळविले असल्याचे दिसुन येते. तसेच अपिलार्थी यांनी माहिती शुल्क भरल्यानंतर कार्यालयातील उपलब्ध माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर कळविल्याचे स्पष्ट होते. वास्तविक अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, त्यांनी एकाच अर्जात अनेक विषयांची माहिती मागितल्याचे दिसून येते. त्याबाबत महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १६/०१/२०१२ च्या अधिसूचनेप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या नियम ३ नंतर पुढील नियम समाविष्ट करण्यात आलेला आहे. त्यानुसार नियम ३(क) एक विनंती अर्ज एका विषयाशी संबंधित असावा आणि त्यात सर्वसाधारण १५० पेक्षा अधिक शब्द नसावेत. अर्जदाराला एकापेक्षा अधिक विषयांची माहिती हवी असेल तर, तो त्याकरिता स्वतंत्र अर्ज करील. परंतु एकापेक्षा अधिक विषयांची माहिती मागितली असेल तर जन माहिती अधिकारी एकाच विषयाशी संबंधित माहिती देईल.

तथापि, अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान आयोगास असे सांगितले की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली, मात्र माहिती शुल्क भरण्याचे पत्र देताना तसेच माहिती पुरविल्याचे पत्र त्रयस्थ व्यक्ती/मुख्याध्यापक, फ्रावंशी इंटरनॅशनल अकॅडेमी गंगापूर-दुगांव नाशिक यांचा काहीही संबंध नसताना देखील त्यांना माहिती दिल्याची प्रत नियमबाह्य त्यांना माहितीकरिता पाठविली. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार

अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

या प्रकरणी अपिलार्थी यांना दिलेली माहिती असपष्ट असल्याने आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली दलित वस्ती सुधारणेबाबतची माहिती अवलोकनाची संधी देऊन पुरविणे योग्य होईल.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०३/०७/२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीसंदर्भात नोंदणीकृत पोचदेय डाकेने पत्र पाठवून उपलब्ध कागदपत्रांच्या समक्ष अवलोकनासाठी १५ दिवसांच्या आतील तारीख व वेळ कळवावी. अवलोकनानंतर अपिलार्थीस त्यातील कागदपत्रांच्या काही प्रती हव्या असल्यास तशी यादी घेऊन आवश्यक माहिती विनामूल्य व्यक्तीश: पुरवावी.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, धोंडेगांव यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० (१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा आदेश प्राप्तीच्या ७ दिवसाचे आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

३) वरील आदेशांसह प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक ३२००/२०२१/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

**(समीर सहाय)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ नाशिक**

प्रति,

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, नाशिक, ता. जि. नाशिक.
यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलटटपाली आयोगाला सादर करावी. तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन अहवाल ३० दिवसांचे आत सादर करावा.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, धोंडेगांव, ता. जि. नाशिक.

क्र.रामाआ-नाशिक/द्वि.अ.क्र. ३२००/२०२१/नाशिक/ओ-2039 दिनांक 20/09/2022